15/2016

MR 2016-17

The Berar General Education Society's

# SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, CIVIL LINES, AKOLA (M.S.)

(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati.)



ONE DAY NATIONAL CONFERENCE
On

# "भारतीय महिला : काल, आज आणि उद्या"

(आंतरविद्याशाखीय)

२४ डिसेंबर २०१६

मराठी भाग - ३



AJANTA PRAKASHAN

ISBN : 978-93-83587-68-1

५

# धाडसी महिला कार्यकर्त्या

प्रा. मेघराज आर. शिंदे
कला महिला महाविद्यालय, मेहकर.

महिला सबलीकरण ही बहुआयामी संकल्पना आहे. केवळ आर्थिक बदल म्हणजे सबलीकरण नाही. यामध्ये स्त्रियांच्या समस्यांचा सर्वांगीण बाजुचा विचार होणे गरजेचे आहे. सांस्कृतिक विकासाच्या समान संधी स्त्रियांना दिल्या पाहिजेत. घटनात्मक दृष्टीकोनातून पाहिले तर घटनेने स्त्रियांना समानतेचा अधिकर दिला आहे. असे असले तरीही स्त्रियांना आजही आधुनिक समजल्या जाणाऱ्या समाजात समानतेची वागणुक दिली जात नाही २०१३ हे वर्ष स्त्रियांच्य हिंसाचाराने चर्चेत राहिले. नवीन वर्षात या घटना घडून नये म्हणून स्त्रियांच्या प्रश्नांवर नवीन कायदा करण्यात आला. या कायद्याची कठोर अंमलबाजावणी होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर महिला सबलीकरण ही दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत योगदान देणाऱ्या काही कार्यकर्त्यांचे विचार लोकापर्यंत पोहोचल्यास समाजाची जाणीव जागृती योग्य दिशेने होत असते सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ, सिमाताई साखरे, किरण बेदी, निलम गोऱ्हे, सिंधुताई सपकाळ इ. महिलांचे विचार समाजापर्यंत पोहचल्यास महिला सबलीकरणाला चालना मिळेल.

सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ कोणत्याही घटनेचे विश्लेषण अभ्यासपूर्ण पध्दतीने करतात. तसेच स्त्रियांच्या प्रश्नाचे मुळ स्त्रियांच्या आंतरक्रियेत आहे हे लक्षात घेऊन विद्या बाळ यांनी २०१२ मध्ये औरंगबद येथे सासू-सून साहित्य संमेलन घेतले होते. सासू-सून यांनी मलाच कळतं म्हणून पुढाकार घेण्यापेक्षा सर्वसंमतीने निर्णय घ्यावेत. असा सार या संमेलनातून पुढे आला. या प्रकारचे नवे व्यासपीठ स्त्री प्रश्नांची समिक्षा चांगल्या प्रकारे करु शकते. पहिल्या महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी यांनी आपल्या लिखानातुन, व्यासपीठावरुन अनेक वेळा स्त्री प्रश्नांवर सडेतोड आवाज उठवला आहे. आपली राजकीय भुमिका स्पष्ट करतांना त्या म्हणतात की, देशात बदल घडून आणायचा असेल तर मतदाराने मतांचा संबध पॉकेट मनिशी भोजनाशी, आश्वासनाशी न जोडता मतदाराने आपले व्यापक भविष्य लक्षात घ्यावे. पाच वर्षासाठी जो आपल्या हिताचे निर्णय घेईल त्यालाच निवडून दयावे. यात स्त्रिप्रश्नांचा संबध नाही परंतु व्यापक भुमिका आहे. म्हणुण स्त्रियांनी आपला प्रश्न माडंणाऱ्या तो लावून धरणाऱ्या व्यक्तीला निवडून देणे गरजेचे आहे. किरण बेदी एके ठिकणी म्हणतात की, शिक्षित आधुनिक म्हणून घेणारे लोक देखिल मुलांची पॉलीशी शिक्षणासाठी व मुलीची लग्नांसाठी काढतात. यात बदल झाला पाहिजे. तसेच अण्णा हजारे यांच्या आंदोलनात किरण बेदी यांनी सक्रीय सहभाग घेतल्यामुळे त्यांना अनेक आरोपांना सामोरे जावे लागले. त्या समर्थपणे सामोरे गेल्या. पुढे त्या त्रिविध आरोपातुन निर्दोष सुटल्या. त्यामुळे तरुण पिढीने किरण बेदी प्रमाणे आपल्या कामावर निष्ठा ठेऊन धाडस केल्यास महिला सक्षमीकरण राजकीय सबलीकरण योग्य दिशेने होईल.

नागपुरच्या सामाजिक कार्यकर्त्या सिमाताई साखरे या अनेक वर्षापासून स्त्रि प्रश्नांवर कार्य करीत आहेत. त्या काही प्रसंग घेऊन लिखान करतात. विविध प्रसंगातून त्या लहान घटनेतील व्यापक समस्या विशद करतात. त्या एका लेखात म्हणतात की, आधुनिक म्हणून घेणारा समाज आजही घर सांभाळणे हि जबाबदारी दोघांची आहे असे मानत नाही. तसेच हा प्रश्न पुरुषाला केला जात नाही. इत्यादी प्रश्न मांडुन समाजातीत साचलेपणावर सिमाताई साखरे हल्ला करतात.

सामाजिक कार्यकर्त्या [illegible] बंग यांनी वेळोवेळी आपल्या लिखानातून भाषणातून स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला आहे. त्या एके ठिकाणी म्हणतात की, स्त्री शक्तीमध्ये देशाचा सुवर्ण काळ आणण्याची ताकद आहे. स्त्रियांनी नवीन पिढी सुस्कारीत केली तर देशाला निश्चित चागले दिवस येतील .

330
Co-Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana



Scanned by TapScanner